महत्त्वाचे

आमदारांनी धरला आदिवासी नृत्यावर ठेका

गडचिरोली : येथे जागतिक आदिवासी दिनानिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. यानिमित्त शहरातून भव्य रॅलीचे आयोजन करण्यात आले. या रॅलीमध्ये आमदार डॉ. देवराव होळी यांनी भाग घेतला. यावेळी त्यांनी रॅलीतील आदिवासी बांधवांसोबत डीजेवरील आदिवासी गाण्यांवर नृत्य केले. याप्रसंगी आमदारांसोबत रॅलीतील सहभागी मुलं, मुली, तरुण, तरुणी, महिला व पुरुष यांनीही डीजेवर आदिवासी नृत्य केले. यावेळी आदिवासी दिनानिमित्त शहरात उत्साहाचे वातावरण होते. रॅलीत सहभागी सर्वांना आमदार होळी यांनी जागतिक आदिवासी दिनाच्या शुभेच्छा दिल्या. ■

वनपरिक्षेत्र अधिकाऱ्यास शिवीगाळ प्रकरणी गुन्हा दाखल

चंद्रपूर : वनपरिक्षेत्र अधिकाऱ्यास शिवीगाळ केल्याप्रकरणी तीन जणांविरुद्ध दुर्गापूर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही कारवाई बुधवारी करण्यात आली. ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्प वनविभागांतर्गत मोहर्ली प्रादेशिक परिक्षेत्रात ८ ऑगस्टला रात्री ८ वाजताच्या सुमारास आरोपी वासुदेव ठाकरे, अक्षय बंडावार (रा. दोघेही भद्रावती), सुबोध तिवारी (रा. माजरी, ता. भद्रावती) हे अडेगाव गावामध्ये लाल रंगाच्या वाहनाने येऊन जंगलाच्या दिशेने जात होते. त्यावेळी वनकर्मचाऱ्यांनी त्यांना जंगल परिसरात फिरण्यास मनाई केली व आगरझरीमार्गे बाहेर निघण्यास सांगितले. आम्हाला वनाच्या बाहेर काढले म्हणून रात्री १०.३९ वाजता त्यांनी भ्रमणध्वनीवरून मोहर्ली (प्रादे.) वनपरिक्षेत्र अधिकारी संतोष थिपे यांना शिवीगाळ केली. या प्रकरणी भादंवि १८६०, कलम १८६, ५०४, ५०७ नुसार दुर्गापूर पोलिस ठाण्यात क्रमांक ०४४१/२०२३, ९/८/२०२३ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. प्रकरणाचा पुढील तपास संतोष थिपे करीत आहे.

विजेच्या धक्क्याने शेतकऱ्याचा मृत्यू

भंडारा : शेतावर धानपिकाला पाणी देण्यासाठी गेलेल्या शेतकऱ्याचा विद्युत प्रवाहाने मृत्यू झाल्याची घटना मंगळवारी सकाळी चिचखेडा येथे घडली. मुनेश्वर उर्फ सेलोकर(४७) रा. चिचखेडा असे मृत शेतकऱ्याचे नाव आहे. मुनेश्वर यांची घराला लागूनच शेती आहे. त्यांनी शेतातील धान पिकाला पाणी देण्यासाठी बोरवेल सुरूकेली. यावेळी बोरवेलला विद्युतपुरवठा करणारा वायर पाण्यावर लोंबकळत असल्याने तो वर करण्याचा प्रयत्न केला. मात्र वायर कापलेला असल्याने विजेचा जबर धक्का लागून ते जागीच कोसळले. त्यांच्या पश्चात दोन मुले, पत्नी आहे.

यवतमाळची गीत बागडे सारेगमप लिटिल चॅम्पमध्ये

यवतमाळ : छोट्यांचे गोड स्वर करणार मनात घरङ्ग ही टॅगलाईन घेऊन ९ ऑगस्टपासून सुरू झालेल्या झी मराठी सारेगमप लिटल चॅम्प कार्यक्रमात यवतमाळच्या गीत प्रशांत बागडे या एकमेव वैदर्भीय शाळकरी मुलीची निवड झाली असून तिच्या गायनाचा आनंद रसिकांना घेता येणार आहे. महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून गायक कलावंताना शोधून रसिकांसमोर सादर करणाऱ्या ङ्गसारेगमप लिटिल चॅम्पङ्ग या कार्यक्रमात पंडित सुरेश वाडकर, डॉ. सलील कुळकर्णी व वैशाली माडे या गायक संगीतकार परीक्षकांनी गीतची निवड केली. संचालन मृण्मयी देशपांडे ही ख्यातनाम अभिनेत्री करत आहे. ९ ऑगस्टच्या पहिल्या भागात गीत बागडे हिने निवडीपूर्वी सादर केलेल्या गाण्याला परीक्षकांनी भरभरून दाद दिली. तिसऱ्या क्रमांकावर गायलेल्या गीतच्या गाण्याला मुख्य परीक्षक पं. सुरेश वाडकर यांच्यासह परीक्षकांनी उभे राहून दाद दिली. गीत बागडे यवतमाळच्या जवाहरलाल दर्डा इंग्लिश मीडियम स्कूलमध्ये आठवीत शिकत आहे. आई रंजना आणि वडील प्रा. प्रशांत बागडे हे दोघेही संगीत विशारद आहेत. संगीत क्षेत्रातील मान्यवरांकडून, मुख्याध्यापक मिनी जॉन, शिक्षक आणि परिसरातील जाणकारांकडूनही गीतचे अभिनंदन होत आहे.

आईसह चिमुकल्याचा मृत्यू; वडील गंभीर जखमी

दर्यापूर : दुचाकीला झालेल्या अपघातात आईसह दोन वर्षांच्या चिमुकल्याचा मृत्यू झाला तर वडील गंभीर जखमी झाले. ही घटना दर्यापूर ते शिंगणापूर मार्गावर असलेल्या लखापूर फाट्याजवळ गुरुवारी रात्री आठ वाजताच्या सुमारास घडली. धारणी येथील धुर्वे कुटुंबीय दर्यापूरवरून गुरुवारचा बाजार घेऊन नायगाव येथे जात होते. अचानक त्यांचे दुचाकी वाहन घसरल्याने संपूर्ण कुटुंब रस्त्यावर कोसळले. बरेच दूरपर्यंत दुचाकी फरफटत गेली. दुचाकीवरील तिघेही बराच वेळपर्यंत रस्त्याच्या कडेला पडून होते. मुख्य मार्गावरून जाणाऱ्या काही नागरिकांनी दर्यापूर पोलिसांना याबाबत सूचना दिली. पोलिसांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली व दर्यापूर येथील उपजिल्हा रुग्णालयातील रुग्णवाहिकेला बोलावून जखमींना रुग्णालयात दाखल केले. डॉक्टरांनी शिवराज शांताराम धुर्वे (वय २ वर्षे) व त्याची आई सुपती शांताराम धुर्वे (वय २८) यांना मृत घोषित केले. ■

मायक्रो फायनान्समध्ये लाखोंची अफरातफर

पाच आरोपींना अटक, दोघे फरार

ताब्यात घेतलेल्या आरोपींसह कारवाईतील पोलिस अधिकारी

◆ **महागाव, १० ऑगस्ट**

मायक्रो फायनान्समध्ये कार्यरत सात कर्मचाऱ्यांनी सभासदांकडून वसूल केलेल्या ४४ लाख ७४ हजार रुपयांची अफरातफर केल्याप्रकरणी महागाव पोलिसांनी ५ आरोपींना जेरबंद केले असून दोन जण फरार झाले आहेत.

महागाव येथे इंडसइंड बँक अंतर्गत भारत फायनान्शियल इन्क्लुजन लि. कंपनीची शाखा असून या शाखेमार्फत महिलांना उद्योगधंद्यासाठी कर्ज पुरवठा केला जातो व दर आठवड्याला सभासदांकडून कर्जवसुली केली जाते. ही जबाबदारी शाखेतील प्रवीण राऊत (कोपरा, बाभूळगाव), खेमदेव भंडारे (साखरा, घाटंजी), शिवप्रसाद सूर्यवंशी (करंजी, हिमायतनगर), गणपत वाढवे (रुई, हदगाव), निरंजन गुरनुले (कनकी, किनवट), शेख युनुस शेख रज्जाक (बळीरामपूर, नांदेड), अर्जुन सोनटक्के (वसंतनगर, यवतमाळ) या कर्मचाऱ्यांकडे होती.

भारत फायनान्शियल इन्क्लुजन लिमिटेड कंपनीने तालुक्यातील अनेक गावांत कर्जवाटप केलेल्या १८७ महिला सदस्यांकडून ४४ लाख ७३ हजार ६९१ रुपये कर्मचाऱ्यांनी वसूल करत स्वतःच्या फायद्याकरिता वापरून कंपनी व कर्ज घेणाऱ्या १८७ सदस्यांची आर्थिक फसवणूक केल्याची बाब लेखापरीक्षण अहवालात स्पष्ट झाली. शाखेचे युनिट व्यवस्थापक नीलेश उपासे यांनी महागाव पोलिसांत तक्रार केली असता प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेऊन परिविक्षाधीन उपविभागीय पोलिस अधिकारी तथा ठाणेदार विनायक कोते यांनी आरोपींच्या अटकेसाठी पोलिसांची ३ पथके नेमली. पथकांनी बाभूळगाव, घाटंजी, हदगाव, किनवट, नांदेड असे वेगवेगळ्या ठिकाणी असलेले आरोपी प्रवीण राऊत, खेमदेव भंडारे, गणपत वाढवे, निरंजन गुरनुले, युनुस शेख यांना ताब्यात घेऊन काही तासांतच अटक केली. तर शिवप्रसाद सूर्यवंशी व अर्जुन सोनटक्के हे आरोपी फरार होण्यात यशस्वी झाले. आरोपींची ११ ऑगस्टपर्यंत पोलिस कोठडीत रवानगी झाली आहे.

ही कारवाई उपविभागीय पोलिस अधिकारी प्रदीप पाडवी यांच्या मार्गदर्शनात उपअधीक्षक विनायक कोते, दीपक ढोमणे, केशव पुंजरवाड, नीलेश पेंढारकर, संतोष जाधव, सुहास कायटे, गजानन जाधव, सुनील जाधव, वसीम शेख, विष्णू काईट यांनी केली. ◂*(तभा वृत्तसेवा)*

वर्षभरात वाढली नाही धाम प्रकल्पाची उंची!

- ३४ दरवाजांसाठी ९ कोटी ७१ लाख
- धरण सांडव्याची उंची १.९० मीटरने वाढवण्याचा प्रस्ताव

◆ **वर्धा, १० ऑगस्ट**

ग्रामीण भागासह शहराला पाणीपुरवठा करणारी धामनदीवर असलेला धाम प्रकल्पातून वर्धेसह ११ ग्रामपंचायतींना पाणीपुरवठा केला जातो. धाम प्रकल्पाची उंची वाढविण्यासाठी कंत्राट दिले गेले. वर्ष उलटत आले असतानाही काम पूर्ण झाले नाही. आता त्या ठिकाणी काम सुरू असल्याने प्रकल्पातील पाणी वाहून जात आहे.

१९९४ पासून धाम प्रकल्पाची उंची वाढविण्यासाठी विविध बैठकांमध्ये चर्चा झाल्या प्रस्ताव देखील करण्यात आले. मात्र, उंचीला हातच लागत नव्हता. ऑगस्ट २०२१ मध्ये धाम प्रकल्पाच्या धरण सांडव्याची उंची १.९० मीटरने वाढविण्याचा प्रस्ताव करण्यात आला. त्याला मंजूरी देखील मिळाली. नागपूर येथे मुख्य अभियंतास्तरीय बैठकीत ५ जुलै २०२१ मध्ये कंत्राटाला मान्यता मिळाली. तर १० ऑगस्ट २०२१ रोजी ९ कोटी ७१ लक्ष ९० हजार ७७० रुपयांचा कार्यरंभ आदेश झाला. तब्बल ३४ स्वयंचलीत दरवाजे बसविण्याच्या कामाला उशिरा सुरवात झाली. ३४ दरवाजे सांडव्याच्या ठिकाणी बसणार असल्याने आधी सांडव्याची उंची कमी करणे अत्यावश्यक झाले. त्यामुळे आधी त्याची उंची कमी करण्यात आली आणि उन्हाळ्यात दरवाजे बसविण्याच्या कामाला सुरुवात करण्यात आली.

बेसमेंट आणि स्ट्रक्चर तयार करताना केलेल्या याच दिरंगाईचा फटका आता पाणी साठवणुकीला बसतो आहे. या पावसाळ्यात झालेला पाऊस सांडव्याची उंची कमी करण्यात आल्याने जलाशयात थांबविणे कठीण झाले आहे. पाणी मोठ्या प्रमाणात वाहून जात आहे. जर पुढील दोन महिन्यात होणारा हा पाऊस असाच वाहत राहिला तर जलाशयाच्या पाणी पातळीत वाढ होणार कशी असाच प्रश्न आहे.

काम सुरू होण्यापूर्वी ६० क्यूबिक मीटर इतकी साठवण क्षमता होती. उंची वाढविल्यानंतर ही क्षमता २० ने वाढून ८० क्यूबिक मीटर इतकी होणार आहे. परंतु, दरवाज्याचे बांधकाम करताना सांडव्याच्या बेसमेंटची उंची पाच फुटाने कमी करण्यात आली आहे. उंची कमी केली पण दरवाजे अद्याप बसले नाही. त्यामुळेच आजघडीला पावसाचे पाणी यातून वाहून जात आहे.

धाम प्रकल्पावर वर्धा शहर आणि शहराच्या सभोवताल असलेल्या ११ मोठ्या ग्राम पंचायती, वर्धा एमआयडीसी, भुगाव येथील लोह प्रकल्प, खरंगणा ते वर्धा या भागातील विविध गावे, आर्वी तालुक्यातील धरण क्षेत्रात येणारे शेतकरी, ◂*(तभा वृत्तसेवा)*

परीक्षा निःशुल्क, तरीही आर्थिक भुर्दंड

◆ **भंडारा, १० ऑगस्ट**

नवोदय विद्यालयाच्या परीक्षेला बसण्यासाठी पाचवीच्या विद्यार्थ्यांसाठी प्रवेश निःशुल्क आहे. मात्र, आभासी अर्ज भरण्यासाठी इंटरनेट कॅफेवर जाऊन वेळ व पैसे खर्च करावा लागत आहे. परिणामी पाचवीतील १६ हजारांवर विद्यार्थ्यांपैकी केवळ ३ हजारांवर विद्यार्थीच अर्ज भरू शकले आहेत. तेव्हा अर्ज सादर करण्यास मुदतवाढ देऊन विद्यार्थ्यांचे अर्ज शाळेतच भरून घ्या, अशी मागणी पालकांकडून होऊ लागली आहे.

केंद्र सरकारने जवाहर नवोदय विद्यालये सुरू केले आहेत. लेखी परीक्षेतील गुणांच्या आधारे नवोदय विद्यालयात प्रवेश दिला जातो. राज्यात ३४ जवाहर नवोदय विद्यालये आहेत. यापैकी मोहाडी तालुक्यातील पाचगाव येथे जवाहर नवोदय विद्यालय स्थापन केले आहे. विद्यालयात प्रवेश घेण्यासाठी जिल्ह्यातील सर्व शाळांमधील पाचवीच्या विद्यार्थ्यांना परीक्षेला बसवण्याच्या सूचना जिल्हा प्रशासनाने दिल्या आहेत.

आभासी अर्ज दाखल करायला एक दिवस शिल्लक असताना आतापर्यंत पाचवीच्या १६,२२७ विद्यार्थ्यांपैकी केवळ ३,३३८ विद्यार्थ्यांनी अर्ज दाखल केले आहेत. नवोदय विद्यालय प्रवेश परीक्षेला शुल्क लागत नाही. परंतु, विद्यार्थ्यांना पासपोर्ट फोटो व आभासी अर्ज करण्यासाठी शंभर रुपयांचा आसपास खर्च येतो. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी ७५ टक्के जागा उपलब्ध असताना तेच विद्यार्थी परीक्षेत कमी बसताना दिसत आहेत, हे विशेष... ◂*(तभा वृत्तसेवा)*

ट्रॅक्टरसह वाळूसाठा जप्त

हिंगणघाट : पोलिसांनी आंबेडकर चौक ते बसस्थानक मार्गावर विना परवाना वाळूची अवैध वाहतूक करणारा ट्रॅक्टर, वाळूसाठा असा ८ लाख ५ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. मिळालेल्या माहितीनुसार, प्रवीण धुटे रा. निशानपुरा वॉर्ड याला वाळू वाहतूक परवानाबाबत विचारणा केली असता त्याने नकार दिला. ट्रॅक्टर स्वप्निल सुरस्कार (रा. निशानपुरा वॉर्ड) यांच्या मालकीचा असून पोलिसांनी गुन्हा नोंद केला. ■

पूरग्रस्तांचे पुनर्वसन, समस्या कायमच!

२२ जुलैचे धावंडा नदीचे रौद्ररूप

◆ **दिग्रस, १० ऑगस्ट**

शहरातील धावंडा आणि मोरणा या नद्यांना आलेल्या पुरामुळे २,७२६ घरांच्या नुकसानीचा प्राथमिक आकडा आहे. नव्याने संसार उभा करण्यासाठी शासनाने पूरग्रस्तांना प्रत्येकी ५ हजार रुपये दिले आहेत. अजून पुढे ५ हजार वितरित होणार असल्याची माहिती आहे. या रकमेत सर्व पूरग्रस्त तात्पुरते समाधानी झाले. मात्र त्यांच्या पुनर्वसन व समस्यांचा महापूर कायमच आहे.

गेल्यावर्षी ७ ऑगस्टला शहरात ९२.८० टक्के पावसाची नोंद झाली होती. नजीकच्या अरुणावती धरणाचे ११ दरवाजे उघडण्यात आले होते, याचा अर्थ अजून ऑगस्ट महिना पावसाचाच आहे. परंतु याचे भान दिग्रसकर पूरग्रस्तांना नसल्याचे जाणवत आहे.

पश्चिमेकडून वळसा घालून शहराच्या मध्यवस्तीतून वाहणाऱ्या धावंडा नदीला २२ जुलैला महापूर आला आणि क्षणार्धात होत्याचे नव्हते झाले. नदीकाठावरील अनेक घरांमध्ये पुराचे पाणी शिरले. साहित्य वाहून गेले इतकेच काय तर अन्नधान्याची नासाडी झाली. अंशतः व नवीन सर्वेक्षण वगळता २२ जुलैनंतर आठवडाभर पूरग्रस्तांना अनेकांनी आपापल्या परीने मदत केली, अन्नछत्र उभारले. परंतु सध्याची स्थिती पाहता पूरग्रस्त पूर्वपदावर आल्याने त्यांच्याप्रती सहानुभूती पुराच्या पाण्याप्रमाणे ओसरली. तर सर्व पूरग्रस्त नदीकाठावरील आपल्या घरात राहू लागले.

शहरातील धावंडा व मोरणा नद्यांना पावसाळा संपेपर्यंत केव्हाही पूर येऊ शकतो आणि पुराचा संभाव्य धोका नाही असे ठाम कोणी सांगू शकणार नाही. पुन्हा नदी दुथडी भरून पूर आला आणि हानी झालीच तर त्यासाठी कोणाला व कोणी जबाबदार धरायचे असा हा विषय आहे.

२० एकर जमिनीवर पूरग्रस्तांचे पुनर्वसन शक्य

शासनाने पूरग्रस्तांच्या पुनर्वसनासाठी २० एकर जमीन अधिग्रहित करून एकरी ४० जणांना ५०० चौरसफूट भूखंड देऊन २० एकर जमिनीवर ८०० पूरग्रस्तांना हक्काची जागा देऊन त्यांचे घरकूल रमाई घरकूल योजना व पंतप्रधान आवास योजनेंतर्गत बांधून देता येऊ शकते. ही जागा कमी पडल्यास ९५२ घरकुलांसाठी घेण्यात आलेली जागा उपलब्ध आहेच. एकदा नदीकाठावरील जागा मोकळी झाली ती जागा 'रेडझोन' करावी, आणि त्यावर अतिक्रमण झालेच तर कायदेशीर कारवाई करावी. गेल्या वीस वर्षांत शासन सानुग्रह निधीच्या नावावर ३० कोटींच्यावर वाटून मोकळे झाले आहे. ◂*(तभा वृत्तसेवा)*

नऊ शूटर्सची फायर आर्म स्पर्धेसाठी निवड

श्रीहव्याप्रमं शूटिंग विभागाला बहुमान

◆ **अमरावती, १० ऑगस्ट**

श्री हनुमान व्यायाम प्रसारक मंडळ अमरावती शूटिंग रेंजच्या एकूण नऊ शूटर्सची गुजरात येथे होणाऱ्या १० व्या वेस्ट झोन स्पर्धेसाठी निवड झाली आहे.

शूटिंग विभागाचे प्रशिक्षक राहुल उगले हे शहरातील पहिले ०.३२ बोअर सेंटर फायर खेळणारे नेमबाज ठरलेत. जान्हवी मनातकर हिने २५ मीटर ज्युनिअर गटातून स्पोर्ट पिस्तुल प्रकारात राज्यातून दुसरा क्रमांक तर तनिष्का देशमुख हिने तिसरा क्रमांक मिळवला. अनमोल मोंडे याने ५० मीटर पिस्टल प्रकारात ज्युनिअर गटातून पहिला क्रमांक तर आदर्श मेश्राम याने ५० मीटर पिस्टल प्रकारात वरिष्ठ गटातून पहिला क्रमांक मिळाविला आहे. जून महिन्यात पार पडलेल्या २६ व्या कॅप्टन इझेकीएल-२०२३ मधून क्रिष्णा शेळके याला ५० मीटर प्रोन रायफल प्रकारात सुवर्णपदक मिळाले. पुष्कर निर्मल याला कांस्यपदक मिळाले आहे. तसेच प्रशिक्षक राहुल उगले, अतुल वडे व शरयू व्हाडे यांची ५० मीटर रायफल प्रोनमधून वेस्ट झोनसाठी निवड झाली आहे. अशाप्रकारे अमरावती शहरामध्ये फायर आर्मची शूटिंग रेंज नसून सुद्धा अत्यंत कमी कालावधीत सराव करून नऊ शूटर्सची निवड गुजरात येथे होणाऱ्या १० व्या वेस्ट झोन शूटिंग स्पर्धेसाठी झाली आहे.

मंडळाचे प्रधान सचिव पद्मश्री प्रभाकर वैद्य, मंडळाचे कार्याध्यक्ष डॉ. रमेश गोडबोले, उपाध्यक्ष डॉ. श्रीकांत चेंडके, सचिव प्रा. डॉ. माधुरी चेंडके, उपाध्यक्ष अॅड. प्रशांत देशपांडे, सचिव रवींद्र खांडेकर, डॉ. ललित शर्मा, आनंद महाजन यांच्यासह सर्व पदाधिकारी, प्रशिक्षक, कर्मचारी यांनी अभिनंदन केले आहे. ◂*(तभा वृत्तसेवा)*

दारू विक्रेत्याला तीन वर्षांची शिक्षा

वर्धा : वाढोणा येथील रहिवासी दारूविक्रेता विजय राऊत (४०) याला तीन वर्षांच्या कारावासाची शिक्षा ठोठाविण्यात आली. हा निर्वाळा आर्वी न्यायालयाचे प्रथमश्रेणी न्यायाधीश व्ही. आर. घराळ यांनी दिला. आर्वी तालुक्यातील वाढोणा येथील रहिवासी दारूविक्रेता विजय राऊत याला पोलिसांनी गावठी दारूची भट्टी चालविताना १९ नोव्हेंबर २०१५ रोजी रंगेहात अटक केली होती. त्याच्याविरुद्ध आर्वी पोलिसात गुन्हा दाखल केला होता. पोलिस अधिकारी प्रवीण जुवारे यांनी प्रकरणाचा तपास करून प्रकरण न्यायप्रविष्ट केले होते. आरोपीविरुद्ध सबळ पुरावा उपलब्ध झाला. शासनाकडून अॅड. ए. डब्ल्यू. जुनार यांनी कामकाज पाहिले. ■

मेळघाटातील रस्ते होत आहेत अरुंद

वनविभागाच्या नियमांची आडकाठी

आधीच्या रस्त्यापेक्षा कमी रुंदीचा बांधलेला रस्ता

◆ **चिखलदरा, १० ऑगस्ट**

मेळघाटातील आधीच्या रस्त्यांपेक्षा नव्या रस्त्यांचे बांधकाम करीत असताना ते कमी रुंदीचे केले जात आहेत. चिखलदरा ते परतवाडा हा रस्ता सुद्धा अतिशय कमी रुंदीचा झालेला आहे. याबरोबरच आता परतवाडा ते धारणी रस्त्यावरील पिली फाटा ते धारणी हा रस्ता नुकताच नवीन झाला असून हा रस्ता सुद्धा पहिल्या रस्त्यापेक्षा अतिशय कमी रुंदीचा झाला आहे.

या अरुंद रस्त्यांवरून चालणे कठीण झाले आहे. विशेष म्हणजे, धारणी ते परतवाडा हा रस्ता राष्ट्रीय महामार्ग असून महाराष्ट्र व मध्यप्रदेश या दोन राज्यांना जोडणारा आहे. या रस्त्यावर मोठ्या प्रमाणात वर्दळ असते. मोठे ट्रक व इतर वाहने मोठ्या प्रमाणात चालतात. त्यामुळे ओव्हरटेक करताना हा रस्ता आता अतिशय कमी पडत आहे. त्यामुळे वाहनांना रस्त्याखाली उतरावे लागत आहे. त्यामुळे अपघाताचे प्रमाण सुद्धा वाढले आहे. संबंधित प्रशासनाने व अधिकाऱ्यांनी या सर्व प्रकाराची चौकशी करावी व हा रस्ता रुंद करावा, अशी मागणी सामान्य नागरिक, वाहनचालक व प्रवाशांकडून केली जात आहे.

वनविभाग जबाबदार

वनविभागाच्या नियमांमुळे हा रस्ता कमी झाला आहे. अगोदर हा रस्ता साडेपाच मीटरचा होता; परंतु वन विभागाच्या रेकॉर्डला हा रस्ता ३.७५ इतका आहे आणि इतक्याच रस्त्याची परवानगी आम्हाला मिळाली आहे. त्यामुळे हा रस्ता ३.७५ मीटरचा करण्यात आला आहे, अशी माहिती सार्वजनिक बांधकाम विभागाचे उपअभियंता नीलेश चौधरी यांनी दिली. ◂*(तभा वृत्तसेवा)*

kotak® **कोटक महिंद्रा बँक लि.**

ई-लिलाव विक्री सूचना

नोंदणीकृत कार्यालय: २७, बीकेसी, सी-२७, जी ब्लॉक, वांद्रे-कुर्ला कॉम्प्लेक्स, वांद्रे (पूर्व), मुंबई - ४०००५१
शाखा: ॲग्री कॅमर्शियल बँकिंग, एचआरबी कॉम्प्लेक्स, मूर्तिजापूर रोड, अकोला-४४४ ००१

चल/अचल संपत्तीच्या विक्रीसाठी ई-लिलाव विक्रीची जाहीर सूचना
बयाणा रक्कम व दस्तऐवज (हार्ड कॉपी) आणि (ऑनलाईन) सादर करण्याची अंतिम तारीख व वेळ १५.०९.२०२३ ला दुपारी ०४:०० वाजता.
ई-लिलावाची तारीख आणि वेळ : १६.०९.२०२३ ला सकाळी ११:३० ते दुपारी ३.०० पर्यंत.
(विक्रीच्या समाप्तीपर्यंत प्रत्येकी ५ मिनिटांच्या अमर्याद विस्तारांसह)

आर्थिक मालमत्तेचे सुरक्षितीकरण आणि पुनर्बांधणी आणि सुरक्षा व्याज कायदा २००२ (२००२ चा क्र. ५४) सरफेसी कायदा या अंतर्गत बँकेकडे गहाण ठेवलेल्या स्थावर मालमत्तेची विक्रीची जाहीर सूचना

ज्याअर्थी, खाली नमूद केलेले कर्जदार कोटक महिंद्र बँक लि.चे थकबाकीदार असून, त्यांच्याकडून खाली नमूद रक्कम आणि त्यावरील व्याज वसूल करायचे असल्याने, कोटक महिंद्र बँक लि.ने आपल्या अधिकारप्राप्त अधिकाऱ्याच्या माध्यमातून सरफेसी कायदा २००२च्या कलम १३(४) अंतर्गत असलेल्या अधिकारांचा वापर करून गहाण असलेल्या संपत्तीचा ताबा घेतला आहे. सोबतच, बँकेने खालील कर्जदारांच्या नावावर असलेल्या या संपत्तीचा सुरक्षा हित (अंमलबजावणी) नियम, २००२ च्या कलम ८ ते ९ अंतर्गत 'आहे त्याच ठिकाणी', 'आहे त्याच स्वरूपात' आणि 'विना तक्रार स्थितीत' लिलाव करण्याचा निर्णय घेतला आहे. ही विक्री खालील स्वाक्षरी करणाऱ्या अधिकाऱ्याच्या माध्यमातून ई-लिलाव मंचावर केली जाणार आहे. या मंचाची माहिती **https://kotakbank.auctiontiger.net** या संकेतस्थळावर तसेच **auctiontigermobileapp** यावर उपलब्ध आहे.

कर्जखाते व कर्जदार/गहाणदार/जमानतदाराचे नाव	मागणी सूचनेनुसार देय रक्कम
१. **मेसर्स अग्रवाल इंडस्ट्रीज (कर्जदार आणि गहाणदार)** त्यांचे प्रवर्तक श्री. विजयकुमार छगनलाल केजडीवाल, **पत्ता :** प्लॉट क्र. एल-९/१, एमआयडीसी फेस III, अकोला इंडस्ट्रीयल एरिया, गाव शिवार, अकोला, महाराष्ट्र-४४४१०४. २. **श्री. विजय सी. केजडीवाल (जमानतदार) पत्ता :** राजेश्वर रेसिडेन्सी, महसूल भवनाजवळ, न्यू राधाकिसन प्लॉट, अकोला महाराष्ट्र-४४४००१. ३. **श्री. पीयूष व्ही. केजडीवाल (जमानतदार) पत्ता :** राजेश्वर रेसिडेन्सी, मेन हॉस्पिटल रोड, शारदा डेली नीड्सच्या बाजूला, महसूल भवनाजवळ, न्यू राधाकिसन प्लॉट, अकोला महाराष्ट्र-४४४००१. ४. **श्रीमती मंजू विजयकुमार केजडीवाल (जमानतदार)** पत्ता : राजेश्वर रेसिडेन्सी, मेन हॉस्पिटल रोड, शारदा डेली नीड्सच्या बाजूला, महसूल भवनाजवळ, न्यू राधाकिसन प्लॉट, अकोला महाराष्ट्र - ४४४००१.	**रु. १,५३,१४,८०९.२९** (रु. एक कोटी त्रेपन्न लाख चौदा हजार आठशे नऊ आणि एकोणतीस पैसे फक्त) **३१.०३.२०२३** रोजीपर्यंत पुढील व्याज, खर्च आणि शुल्कासह.

अचल मालमत्तेचे वर्णन	बयाणा रक्कम रेमिटन्स खात्याचा तपशील	राखीव किंमत बयाणा रक्कम जमा वाढीव बोलीची रक्कम
प्लॉट क्र. एल-९/१, अकोला इंडस्ट्रीयल एरिया, शिवार गावाच्या हद्दीत तालुका आणि जिल्हा अकोला या प्लॉटचे क्षेत्रफळ १९८०.०० चौरस मीटर मालकी हक्क **मेसर्स अग्रवाल इंडस्ट्रीज** द्वारा त्यांचे प्रवर्तक **श्री. विजय कुमार छगनलाल केजडीवाल** यावरील सर्व वस्तू आणि तुकडा. या मालमत्तेच्या चर्तु:सीमा अशा (मूल्यमापन अहवालानुसार) :- **पूर्वेकडे :** एमआयडीसी प्लॉट क्र. एल-८/२, **पश्चिमेकडे :** एमआयडीसी इस्टेट रोड, **उत्तरेकडे :** एमआयडीसी प्लॉट क्र. एल-९/२, **दक्षिणेकडे :** एमआयडीसी इस्टेट रोड. सोबतच, इमारतींमधील फिक्चर्स आणि फिटिंग तसेच जमिनीशी संलग्न असलेले बांधकाम किंवा जमिनीशी संलग्न असलेले सध्याचे आणि भविष्यातील अन्य कायमस्वरूपी बांधकाम तसेच सर्व वहिवाटी/मामूल हक्क आणि संलग्न बाबी.	**खाते क्र. ०६४१० १२५२७२००१ कोटक महिंद्रा बँक लि., नरीमन पॉईंट शाखा, मुंबई आयएफसी कोड : केकेबीके ००००९५८**	**राखीव किंमत : रु. २,४४,००,०००/-** **बयाणा रक्कम जमा : रु. २४,४०,०००/-** **वाढीव बोलीची रक्कम : रु. १,००,०००/-**

टीडीएस कपात : लिलावाच्या किंमतीच्या १%

टीडीएस कपातीसंदर्भातील अटी : टीडीएस कापला जाईल व तारण ठेवणाऱ्यांच्या नावावर जमा केला जाईल. जर गहाण ठेवलेल्या मालमत्तेची संयुक्त मालकी असेल तर, टीडीएस पहिल्या मालकाच्या नावावर नोंदवला जाईल, जोपर्यंत विक्री डीडमध्ये मालकीचे विशिष्ट गुणोत्तर नसेल, अशा परिस्थितीत टीडीएस त्यांच्या मालकी गुणोत्तराच्या प्रमाणात कापला जाईल. **लिलाव**
खरेदीदाराने टीडीएस जमा केल्यानंतर, टीडीएस पेमेंट व पुष्टीकरणाचा पुरावा म्हणून फॉर्म क्रमांक १६ए सादर करावा लागेल.

अटी व शर्ती : (१) ई-लिलाव **'जसे आहे तिथे आहे आणि जसे आहे तेच आहे'** आणि कोणतीही तक्रार राहणार नाही या तत्तावर करण्यात येईल. अधिकृत अधिकाऱ्यांच्या ज्ञान आणि माहितीनुसार, मालमत्तेवर कोणतेही भार नाहीत. तथापि, इच्छूक बोलीदारांनी त्यांची बोली सादर करण्यापूर्वी, मालमत्तेचे बोजा, मालमत्तेचे टायटल/लिलावात ठेवलेले दावे/हक्क/देय याविषयी स्वतः स्वतंत्र चौकशी करावी. अधिकृत अधिकारी/सुरक्षित कर्जदार कोणत्याही तृतीय पक्षाच्या दाव्यासाठी/अधिकार/देयांसाठी कोणत्याही प्रकारे जबाबदार असणार नाही. **(२)** बोली सादर करण्यापूर्वी मालमत्ता आणि तपशीलाची तपासणी करणे आणि त्याचे समाधान करणे ही बोलीदाराची जबाबदारी असेल. स्टेट रिकव्हरी मॅनेजर - एबीजी यांच्याशी सल्लामसलत करून बँकेच्या कामकाजाच्या दिवसांत इच्छुक बोलीदारांना लिलावात ठेवलेल्या मालमत्तेची तपासणी करण्याची परवानगी दिली जाईल. **(३)** इच्छुक बोलीदार लिलावाच्या तपशीलांसाठी आणि विक्रीच्या अटी व शर्तींसाठी बँकेच्या अधिकृत वेबसाईट- **https://www.kotak.com/en/bank-auctions.html** ला भेट देऊ शकतात. (**"https://kotakbank.auctiontiger.net"** वर नाव नोंदणी करून वापरकर्ता लॉगीन आयडी आणि पासवर्ड मोफत मिळू शकतो) त्यांच्या लॉगिन आयडी आणि पासवर्डद्वारे. राखीव किमतीच्या १०% बयाणा रक्कम मुंबई येथे देय असलेल्या **कोटक महिंद्रा बँक लिमिटेडच्या** नावे डिमांड ड्राफ्ट/ऑनलाईन द्वारे देय असेल आणि परिशिष्ट II व III योग्यरित्या भरलेल्या आणि स्वाक्षरी केलेल्या प्रतसह संबंधित बँकेच्या शाखेत **१५.०९.२०२३ रोजी दुपारी ४.०० वाजता** किंवा त्यापूर्वी निविदा फॉर्मसोबत जमा करावे. **(४)** वेब पोर्टलमध्ये बोलीदारांनी नोंदणी केल्यानंतर, इच्छुक खरेदीदार/बोली बोलणारे बोली सादर करण्याच्या शेवटच्या तारखेपूर्वी वेब पोर्टलवर अपलोड केलेल्या खालील कागदपत्रांच्या प्रती मिळवणे आवश्यक आहे. (I) डिमांड ड्राफ्टची प्रत. (II) पॅन कार्डची प्रत, (III) ओळखीचा पुरावा, (KYC) उदा. मतदार ओळखपत्र/ड्रायव्हिंग लायसन्स/पासपोर्ट इत्यादीची प्रत, (iv) पत्त्याच्या पुराव्याची प्रत, (V) परिशिष्ट II व III ची रीतसर भरलेली आणि स्वाक्षरी केलेली प्रत हे सर्व निविदा फॉर्मशी संलग्न केलेली नसल्यास बोली नाकारली जाऊ शकते. **(५)** इच्छुक बोलीदार ज्यांना लॉगिन आयडी आणि पासवर्ड तयार करणे, डेटा अपलोड करणे, बोली सादर करणे, ई-बिडिंग प्रक्रियेचे प्रशिक्षण इत्यादीसाठी सहाय्य आवश्यक असल्यास त्यांनी मेसर्स ई-प्रोक्योरमेंट टेक्नॉलॉजीज लिमिटेड (ऑक्शन टायगर), अहमदाबाद यांच्याकडून ई-लिलावाचे ऑनलाईन प्रशिक्षण घेऊ शकतात. संपर्क व्यक्ती- श्री .राम शर्मा, मोबाईल क्रमांक ९९७८५९१८८८ व ६३५१८९६८३३, संपर्क क्रमांक : ०७९-६८१३६८३७/६८१३६८८०/६८१३६८४४. ई-मेल आयडी: ramprasad@auctiontiger.net, support@auctiontiger.net/ ऑक्शन टायगर मोबाइल ॲपवर आणि मालमत्तेशी संबंधित कोणत्याही प्रश्नासाठी बँक अधिकाऱ्यांशी कामकाजाच्या दिवसांत कार्यालयीन वेळेत संपर्क साधू शकतात त्यांचे नाव व क्रमांक पुढीलप्रमाणे : २७ बीकेसी, ६ वा मजला, प्लॉट क्रमांक सी-२७, जी ब्लॉक, वांद्रे कुर्ला कॉम्प्लेक्स, वांद्रे-पूर्व, मुंबई-४०००५१, **श्री. दुष्यंतसिंह झाला, मोबाईल: +९१-९०९९०९१२६२,** ईमेल:- dushyantsinh.zala@kotak.com. आणि **श्री. मयूर पगारे, मोबाईल: +९१-९७०२६४३०५३,** ईमेल:- mayurpagare@kotak.com. **(६)** केवळ वैध वापरकर्ता आयडी/पासवर्ड धारण केलेले आणि डिमांड ड्राफ्ट/ऑनलाइनद्वारे ईएमडीचे पुष्टी केलेले खरेदीदारच ऑनलाइन लिलाव प्रक्रियेत सहभागी होण्यासाठी पात्र असतील. **(७)** ज्या इच्छुक बोलीदारांनी त्यांचा ईएमडी राखीव किंमतीच्या १०% पेक्षा कमी नसणारा, डिमांड ड्राफ्ट/ऑनलाईन **१५.०९.२०२३ रोजी दुपारी ४.०० पूर्वी** सादर केला आहे तेच फक्त ई-लिलावात सहभागी होण्यासाठी पात्र असेल. वरील मालमत्तेचा ई-लिलाव नियोजित तारखेला आणि वेळेवर वरील नमूद केल्याप्रमाणे बोलीदारांमध्ये परस्पर बोलीद्वारे केला जाईल. बोलीदारांनी मालमत्तेवरील बोली वाढीव रक्कम या स्तंभाखाली नमूद केलेल्या रकमेच्या पटीत सुधारणा करतील. ई-लिलाव बंद होण्याच्या वेळेच्या शेवटच्या ५ मिनिटांत बोली लावल्यास, बंद होण्याची वेळ आपोआप ५ मिनिटांसाठी वाढविली जाईल. (प्रत्येकी ५ मिनिटांच्या अमर्याद विस्ताराच्या अधीन). ऑनलाइन लिलाव बंद केल्यावर सर्वाधिक बोली (राखीव किंमतीपेक्षा कमी नाही) सादर करणाऱ्या बोलीदारास यशस्वी बोलीदार म्हणून घोषित केले जाईल आणि त्यासंदर्भातील संप्रेषण इलेक्ट्रॉनिक मोडद्वारे जारी केले जाईल जे अधिकृत अधिकारी/सुरक्षित कर्जदाराच्या मान्यतेच्या अधीन असेल. **(८)** यशस्वी बोलीदाराची बयाणा रक्कम ठेव (ईएमडी) विक्री विचारात ठेवली जाईल आणि अयशस्वी बोलीदारांची ईएमडी परत केली जाईल. बयाणा रक्कम जमावर कोणतेही व्याज दिले जाणार नाही. यशस्वी बोली लावणाऱ्याला अधिकृत अधिकाऱ्याने बोलीची किंमत स्वीकारल्यापासून ४८ तासांच्या आत, आधीच भरलेल्या ईएमडीची रक्कम धरून विक्री किमतीच्या २५% आणि उर्वरित ७५% विक्रीच्या १५ व्या दिवशी किंवा त्यापूर्वी जमा करावी लागेल किंवा फक्त अधिकृत अधिकाऱ्याच्या विवेकबुद्धीनुसार लिखित स्वरूपात दिलेल्या विस्तारित कालावधीत जमा करावी लागेल. यशस्वी बोलीदाराने पैसे भरण्यात चूक केल्यास, बोलीदाराने आधीच जमा केलेली रक्कम जप्त केली जाईल आणि मालमत्तेचा पुन्हा लिलाव केला जाईल आणि चूक करणाऱ्या बोलीदाराचा मालमत्तेवर/रक्कमे संदर्भात कोणताही दावा/हक्क असणार नाही. **९)** संभाव्य पात्र बोलीदार मेसर्स ई-प्रोक्योरमेंट टेक्नॉलॉजीज लि. कडून ई-लिलावाच्या तारखेपूर्वी ई-लिलावाबाबत ऑनलाइन प्रशिक्षण घेऊ शकतात. त्यानंतर मेसर्स ई-प्रोक्योरमेंट टेक्नॉलॉजीज लि./अधिकृत अधिकारी/बँक किंवा मेसर्स ई-प्रोक्योरमेंट टेक्नॉलॉजीज लि. कोणत्याही नेटवर्क समस्येसाठी जबाबदार नसेल आणि ई-लिलाव प्रक्रियेमध्ये सहभागी होण्यासाठी ते तांत्रिकदृष्ट्या सुसज्ज आहेत याची खात्री करून घेण्याची जबाबदारी इच्छुक बोलीदाराची राहील. **(१०)** खरेदीदारला लागू मुद्रांक शुल्क/अतिरिक्त मुद्रांक शुल्क/हस्तांतरण शुल्क, फी इ. तसेच सर्व वैधानिक/वैधानिक देय, कर, दर, मूल्यांकन, शुल्क, फी इत्यादी भरावा लागेल. **(११)** अधिकृत अधिकारी सर्वोच्च प्रस्ताव स्वीकारण्यास बांधील नाही आणि अधिकृत अधिकाऱ्याला कोणतेही कारण न देता कोणतीही किंवा सर्व प्रस्ताव स्वीकारण्याचा किंवा नाकारण्याचा किंवा ई-लिलाव पुढे ढकलण्याचा/रद्द करण्याचा पूर्ण अधिकार आहे. **(१२)** बोलीदारांना त्यांच्या बोली सादर करण्यापूर्वी आणि ई-लिलावात भाग घेण्यापूर्वी मेसर्स ई-प्रोक्योरमेंट टेक्नॉलॉजीज लि. ची वेबसाईट https://kotakbank.auctiontiger.net या वर उपलब्ध असलेल्या ई-लिलावाच्या तपशीलवार अटी व शर्तींचा अभ्यास करण्याचा सल्ला दिला जातो. **(१३)** ही प्रकाशित जाहिरात फोर्स मेजुअर्स क्लॉजच्या अधीन आहे. **(१४)** विक्री प्रमाणपत्र संपूर्ण विक्रीचा विचार केल्यानंतर आणि लिलाव खरेदीदाराकडून फॉर्म क्रमांक १६ए अंतर्गत टीडीएस प्रमाणपत्र सादर केल्यानंतर आणि सुरक्षित धनकोने विक्रीची पुष्टी केल्यानंतर जारी केले जाईल. यशस्वी बोलीदाराच्या नावाने विक्री प्रमाणपत्र जारी केले जाईल. ई-लिलावात बोली सादर केलेल्या/भाग घेतलेल्या व्यक्तीशिवाय विक्री प्रमाणपत्रात नाव बदलण्याची विनंती मान्य केली जाणार नाही. **(१५)** बोलीदाराने एकदा सादर केलेली बोली, रद्द करता येणार नाही/मागे घेता येणार नाही आणि बोलीदार अंतिम बोलीच्या किमतीवर मालमत्ता खरेदी करण्यास बांधील असेल. त्यात नमूद केलेल्या ई-लिलावाच्या कोणत्याही अटी व शर्तींचे पालन करण्यात बोलीदार अयशस्वी झाल्यास, चूक करणाऱ्या बोलीदाराची भरलेली रक्कम जप्त केली जाईल. **(१६)** यशस्वी बोलीदाराच्या घोषणेबाबत अधिकृत अधिकाऱ्याचा निर्णय अंतिम असेल आणि सर्व बोलीदारांना बंधनकारक असेल. अधिकृत अधिकारी कोणतेही कारण न देता, यशस्वी बोलीदार घोषित करण्यापूर्वी, कोणत्याही वेळी ई-लिलाव प्रक्रिया/निविदा रद्द करण्यास स्वतंत्र असेल. सशर्त बोली अवैध मानल्या जाऊ शकतात. कृपया लक्षात घ्या की बोली सादर केल्यानंतर, बोली मधील कोणत्याही बदलाबाबत कोणताही पत्रव्यवहार विचारात घेतला जाणार नाही. सर्व वैधानिक/गैर-वैधानिक देय, कर, दर, मूल्यांकन, शुल्क, फी इत्यादी भरणे ही केवळ यशस्वी बोलीदाराचीच जबाबदारी असेल. बोलीची वैधता, बोलीची रक्कम, बोलीदाराच्या पात्रतेसाठी एकदा बयाणा रक्कम, बोलीदाराचे प्रतिनिधित्व करणाऱ्या व्यक्तीचे अधिकार, व्याख्या याबाबत कोणताही वाद उद्भवल्यास अधिकृत अधिकाऱ्याचा निर्णय अंतिम असेल. अशा परिस्थितीत, बँकेला स्वतःच्या विवेकबुद्धीनुसार कोणत्याही तारखेला व बँकेने ठरवलेल्या वेळी मालमत्ता विक्री बंद करण्याचा आणि मालमत्ता पुन्हा विक्रीसाठी ठेवण्याचा अधिकार असेल. कोणत्याही प्रकारच्या वादासाठी, बोलीदारांनी फक्त संबंधित बँक शाखेच्या संबंधित अधिकृत अधिकाऱ्याशी संपर्क साधावा. **(१७)** विशेष सूचना, शेवटच्या क्षणी बोली लावणे हे बोलीदारांनी स्वतःच्या हितासाठी टाळावे. **कोटक महिंद्रा बँक लि.** किंवा सेवा प्रदाता संस्था कोणत्याही त्रुटी/बिघाड (इंटरनेट बिघाड/पॉवर फेल इ.) साठी जबाबदार असणार नाहीत. अशा आकस्मिक परिस्थितींपासून बचाव करण्यासाठी बोलीदारांना विनंती केली जाते की, त्यांनी सर्व आवश्यक व्यवस्था/पर्याय जसे की वीज पुरवठा बॅक-अप इत्यादी कराव्यात, जेणेकरून ते अशा परिस्थितीपासून बचाव करू शकतील आणि लिलावात यशस्वीपणे सहभागी होऊ शकतील.

(तपशीलवार अटी व शर्तींसाठी कृपया **मेसर्स ई-प्रोक्योरमेंट टेक्नॉलॉजीज लि.** ची **https://kotakbank.auctiontiger.net** ही वेबसाइट पहा)

सुरक्षा व्याज (अंमलबजावणी) नियम २००२ च्या नियम ६(२)/८(६) आणि ९(१) अंतर्गत ३० दिवसांची वैधानिक विक्री सूचना म्हणून गणली जाऊ शकते.

टीप:- कर्जदार/जामीनदार/गहाणखतदारांना याद्वारे अधिसूचित करण्यात आले आहे की, वर नमूद केल्यानुसार अद्ययावत व्याज आणि सहाय्यक खर्चासह मालमत्तेची पूर्तता ३० दिवसांच्या आत जमा करावी, यात अयशस्वी झाल्यास मालमत्तेचा लिलाव/विक्री केली जाईल आणि बाकीची देय रक्कम, व्याज आणि किमतीसह वसूल केली जाईल.

दिनांक : ०९.०८.२०२३
स्थळ : अकोला

स्वा/-
अधिकृत अधिकारी
कोटक महिंद्रा बँक